दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.३ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com




## पनवेल परिसरात शोभा यात्रा काढून नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन वर्षाच्या प्रतिक्षेनंतर पनवेल शहरासह नवीन पनवेल, खांदा वसाहत, कामोठा, खारघर, करंजाडे आदी परिसरात नववर्षाचे स्वागत करण्यासाठी शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पनवेल शहरात नववर्ष स्वागत समिती पनवेलच्यावतीने गुढीपाडव्यानिमित्त शहरात शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. तसेच नवीन पनवेल येथे नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रिडा मंडळाच्या वतीने भव्य शोभा यात्रा आयोजित करण्यात आली होती. यावेळी

.../२




# ‘एक्सप्रेस वे’ विकास कामांचे होणार लोकार्पण आणि भूमिपूजन

## आज नितीन गडकरी पनवेलमध्ये

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल व उरण तालुक्यातील ७७०० कोटी रुपयांच्या 'एक्सप्रेस वे' विकास कामांचे लोकार्पण तसेच भूमिपूजन आज रविवार दिनांक ०३ एप्रिल रोजी सायंकाळी ०५ वाजता केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते होणार आहे.




पनवेल व उरण तालुक्याच्या जनतेला उत्कृष्ट आणि जागतिक दर्जाचा रस्ता मिळावा, यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे जेएनपीटी उरण ते पनवेल रस्त्याची मागणी व पाठपुरावा केला होता, त्यानुसार ३५०० कोटी रुपयांचा जेएनपीटी पोर्ट रोड पूर्ण झाला असून त्याचे लोकार्पण होणार आहे. कळंबोली येथील जंक्शनच्या वाहतूक कोंडीतून प्रवाशांची सुटका व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नाने ८०० कोटी रुपयांचा कळंबोली जंक्शन विस्तारीकरण प्रकल्प होणार असून त्याचे भूमिपूजन होणार आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पूर्वे कडील प्रवेशद्वाराचा भूमिपूजन होणार आहे. त्याचबरोबर उरण–जेएनपीटी–चौक या ३००० कोटी रुपयांच्या नवीन महामार्गाची घोषणा यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी करणार आहेत. पनवेल, उरण आणि चौक परिसराच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे विकासकामे होणार आहेत. त्यामुळे इंधन व वेळेची बचत, वाहतूककोंडी आणि अप–घातापासून मुक्ती, सहज आणि सोपा प्रवास तसेच उद्योगधंदे व व्यापाराला चालना मिळणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ चिंचपाडा गाव येथे लोकार्पण व भूमिपूजन सोहळा असून या कार्यक्रमास राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री आदिती तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, खासदार कुमार केतकर, खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनिल तटकरे, खासदार राजन विचारे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रवीशेठ पाटील, आमदार मंदा म्हात्रे, आमदार निरंजन डावखरे, आमदार जयंत पाटील, आमदार अनिकेत तटकरे, आमदार बाळाराम पाटील, यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी, अधिकारी यांची उपस्थिती असणार आहे.

# ‘महाराष्ट्रातील पहिली बुलेट ट्रेन नागपूरला जायला हवी होती : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

केंद्र सरकार मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी आग्रही आहे. मात्र, देशातील पहिली बुलेट ट्रेन सुरु करायचीच होती तर ती मुंबई–अहमदाबाद नव्हे तर मुंबई–नागपूर असायला हवी होती. जेणेकरून राज्याची राजधानी आणि उपराज–धानी जोडली गेली असती. त्याचा फायदा महाराष्ट्राला झाला असता. मुंबई– अहमदाबाद बुलेट ट्रेन ही राज्यासाठी तितकीशी फायदेशीर नाही, असे सांगत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला लक्ष्य केले. ते शनिवारी मुंबईतील मेट्रो प्रकल्पांच्या उद्घाटन सोहळ्यात बोलत होते.




यावेळी उद्धव ठाकरे यांनी बुलेट ट्रेन प्रकल्प आणि मेट्रो कारशेडच्या मुद्द्यावरून केंद्रातील भाजप सरकारला चिमटे काढले. मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी केंद्र सरकार आग्रही आहे. त्यासाठी केंद्र सरकार मुंबईच्या बीकेसी परिसरातील लाखमोलाची जमीन मागत आहे. ही जागा आपण आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रासाठी राखू ठेवली होती. केंद्र सरकार ही जमीन घेत असेल

.../२

# खोपोलीजवळ मलायका अरोराच्या गाडीला अपघात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अभिनेत्री मलाइका अरोरा यांच्या गाडीला खोपोलीजवळ अपघात झाला आहे. अभिनेत्री मलाइका अरोरा यांच्या चालकाचा गाडीवरील ताबा सुटून राज ठाकरे यांच्या सभेला पुण्यावरून जात असणाऱ्या मनसे पदाधिकाऱ्यांच्या तीन–चार गाड्यांना अभिनेत्री मलाइका अरोरा हिच्या गाडीने धडक दिली. या घटनेत अभिनेत्री मलाइका अरोरा हिच्या डोक्याला दुखापत झाली असून, तिला नवी मुंबईतील रुग्णालयात



.../२

# उलवे येथील भूखंड तिरुपती देवस्थानाला मंदिरासाठी देण्याचा प्रस्ताव सिडको राज्य शासनाला पाठवणार

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

जगविख्यात तिरुपती तिरुमला देवस्थान यांना नवी मुंबईतील उलवे येथे मंदिरासाठी भूखंड वाटप करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा निर्णय सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील भक्तगणांना देखील श्री व्यंकटेश्वराचे दर्शन घेणे सुलभ व्हावे यासाठी तिरुपती तिरुमला देवस्थानाला मंदिर उभारण्याकरिता या भूखंडाचे वाटप करण्यात येणार आहे. नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, आणि पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे यांनी सदर प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता घेऊन शासनाच्या मंजूरीस पाठवण्याची सूचना सिडकोला केली होती, त्यानुसार गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सिडकोच्या संचालक मंडळाच्या बैठकीत यासंदर्भातील प्रस्तावावर विचार करून प्रचलित धोरणानुसार शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

श्री. व्यंकटेश्वराचे दर्शन घेण्यासाठी आंध्र प्रदे–शातील तिरूपती येथे जाणे सर्वसामान्यांना शक्य होत नाही. अशा भक्तांकरिता महाराष्ट्रात आणि विशेषतः महामुंबईत श्री. व्यंकटेश्वराचे मंदिर उभारावे अशी वारंवार मागणी तिरुपती तिरुमला देवस्थान यांच्याकडून राज्य शासनाला करण्यात येत होती. या अनुषंगाने तिरुमला तिरुपती देवस्थान अध्यक्ष सुब्बा रेड्डी यांनी २७ फेब्रुवारी २०२२ रोजी पत्र लिहून नवी मुंबई येथे साकारण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नजीक मंदिर उभारण्यासाठी जागा मंजूर

.../२




# दुर्दैवी ऱ्हासपर्व

एकेकाळी महाराष्ट्राची शान असणारी एसटी आणि एसटी सेवा चालविणारे महामंडळ यांचा नवीन; पण शोचनीय प्रवास सुरू होतो आहे, असे दिसते. गेल्या पाच महिन्यांहून अधिक काळ चाललेला एसटीचा संप मागे घेण्याची राज्य सरकारने घातलेली मुदत आता संपली आहे. त्यामुळे, आता एका बाजूला संपकरी कर्मचाऱ्यांची बडतर्फी आणि दुसरीकडे, खासगी बसगाड्यांची; तसेच कंत्राटी कामगारांची भरती, अशी वाटचाल सुरू होणार आहे. एसटी महामंडळ आणि सेवेचा हा खासगीकरणाच्या दिशेने सुरू होणारा प्रवास दिसतो. तो रोखण्याची इच्छाशक्ती ना सरकारमध्ये आहे, ना कामगार नेत्यांमध्ये आणि ना या संपाचा मूक साक्षीदार असलेल्या मराठी समाजात. सव्वा लाख मंजूर कर्मचारीसंख्या असणारे हे महाराष्ट्रातले सर्वांत मोठे महामंडळ. सध्या सेवेत असणाऱ्या ८४ हजार कर्मचाऱ्यांपैकी ३४ हजार कामावर परतले. याचा अर्थ, तब्बल ५० हजार कर्मचाऱ्यांवर आता बडतर्फीची तलवार आहे. दहा हजार याआधीच बडतर्फ झाले आहेत. अशा स्थितीत आता मोठ्या प्रमाणात खासगी बसगाड्या आणि चालक-वाहक आणून, बंद असणाऱ्या सेवा सुरू करण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे. आताच सरकार १२ हजार खासगी बसगाड्या भाडेतत्त्वावर घेणार आहे. या गाड्या काही अचानक आकाशातून पडणार नाहीत. यातल्या अनेक आजही एसटीला स्पर्धक म्हणून किंवा संपकाळात पर्याय म्हणून धावत आहेत. त्याच उद्या कपाळावर एसटी महामंडळाची पट्टी लावून धावताना दिसल्या, तर आश्चर्य वाटायला नको. याचा अर्थ, ज्या खासगी बससेवेने एसटीला अतोनात त्रास दिला, एसटीचे प्रवासी पळवले आणि सरकारला कोट्यवधी रुपयांना बुडवले, तीच आता अधिकृत सेवा म्हणून गावोगावी बाहेरच्या रस्त्यांवरून एसटी डेपोंमध्ये येणार आहे. महाराष्ट्रात ५५ महामंडळे आहेत. काही तर मरणपंथाला लागली आहेत. याशिवाय अनेक मंडळे आहेत. एसटी कर्मचाऱ्यांचे सरकारी सेवेत विलीनीकरण, याचा अर्थ या सर्व महामंडळे आणि काही मंडळांना सरकारी सेवेचे गाजर दाखविण्यासारखे होते. एसटीचा निर्णय काय होतो आहे, हेच या महामंडळांमधील कर्मचारी पाहत असणार. या सर्व महामंडळांचा संभाव्य आर्थिक बोजा पत्करण्याएवढी महाराष्ट्राच्या तिजोरीची अवस्था संपन्न नाही. अनेक महामंडळे पांढरे हत्ती होऊन बसले आहेत; मात्र एसटी आणि अशी महामंडळे यांच्यात फरक होता आणि आहे. दुर्दैवाने, हे कोणीही समजावून न घेतल्याने आणि वेळीच खंबीर कृती न केल्याने आज ही अवस्था आली आहे. ती आता सावरली जाणार की घसरतच राहणार, हेही सरकारच्या इच्छाशक्तीवर अवलंबून आहे. आता केवळ एसटीच्या बसगाड्याच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या ताब्यात जाणार नाहीत, तर राज्यभरातल्या यंत्रशाळाही खासगी कंत्राटदारांच्या ताब्यात जाऊ शकतात. याचा पुढचा टप्पा, एसटी डेपो, स्थानके आणि तेथील सर्व सेवा यांचे खासगीकरण होण्याचा असू शकतो. या साऱ्या टप्प्याटप्प्याने होणाऱ्या प्रक्रियेत एसटी नावाची एकेकाळी महाराष्ट्राला अतिशय अभिमानास्पद वाटणारी लोकसेवा संपून, निव्वळ बजबजपुरी माजण्याची भीती आहे. याची सगळी जबाबदारी सरकार, कर्मचाऱ्यांना खोटी स्वप्ने दाखवून चिथावणारे कामगार नेते आणि एसटीला तोट्याच्या खाईत ढकलणारे सर्व घटक यांची असेल. आज राज्यभरातल्या एसटीचे सर्व डेपो, कार्यशाळा आणि स्थानके यांचे बाजारभावाने मूल्यांकन केले, तर ते काही हजार कोटी रुपयांच्या घरात जाईल. इतकी प्रचंड अचल मत्ता असणारी संस्था आणि रोजची कित्येक कोटी रुपयांची उलाढाल असणारी सेवा, अशा संकटात पडावी, यामागे गैरव्यवस्थापन, भ्रष्टाचार आणि वरपासून खालपर्यंत झिरपलेली हलगर्जी हेच आहे. आज सरकारने काहीही ठरवले असले, तरी हा प्रश्न न्यायालयातही आहे. न्यायालयाचे या आधीचे आदेश संपकरी कर्मचाऱ्यांनी पाळले आहेत का, हाही प्रश्न आहे. या पलीकडे उद्या संप असाच चालू राहिला आणि एसटीची सेवा कंत्राटी कर्मचारी; तसेच वाहक-चालकांच्या जिवावर पूर्ववत झाली, तर संपकऱ्यांच्या हातात काय राहील, याचा विचार आजही व्हायला तयार नाही. ही केवळ ऱ्हस्वदृष्टी नाही, तर एसटी कर्मचाऱ्यांशी केलेला द्रोह आहे. या साऱ्या विवादात एसटी सवलतीत वापरणारे ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रोज दोनदोनशे किलोमीटर प्रवास करणारे नोकरदार, छोटे व्यावसायिक यांच्या आवाजाला तर काही किंमतच नाही. या संपाच्या निमित्ताने एसटीचा ऱ्हास होतो आहे, तर होऊनच जाऊ द्या, अशी गिधाडभावना बाळगणारेही अनेक असतील. अशा साऱ्यांचा डाव यशस्वी होतो आहे, हे महाराष्ट्राचे दुर्दैव. उभ्या देशात महाराष्ट्र एसटी सेवेचे नाव होते. गेल्या २५ ते ३० वर्षांमध्ये, उदारीकरण सुरू झाल्यानंतर सत्तेवर आलेल्या एकाही सरकारने भविष्याचा अंदाज घेऊन पावले टाकली नाहीत. आधुनिकीकरण केले नाही. एसटी फायद्यात आणली नाही. यात शेवटी तोटा होणार तो कोट्यवधी सामान्य प्रवाशांचा. त्यांची फिकीर कोण करतो?

# गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर बापुजीदेव मंदिराच्या लोकार्पण सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

चिरनेर पंचक्रोशीतील नागरिकांचे ग्रामदैवत असलेल्या श्री बापुजी देव मंदिराचा लोकार्पण सोहळा व मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचा शुभारंभ माजी आमदार मनो-हरशेठ भोईर यांच्या हस्ते गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर करण्यात आले.

चिरनेर पंचक्रोशीतील नागरिकांचे ग्रामदैवत असलेल्या श्री बापुजी देव मंदिर परिसराची पावसाळ्यातील वादळामुळे मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली होती. अशा मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांनी शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला. उरण पंचायत समितीचे माजी सभापती भास्कर मोकल यांनी सदर मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम हाती घेतले. तसेच कोरोनाच्या काळात ही भास्कर मोकल यांनी स्वतः च्या खिशातील निधी खर्च करून एक दूमदार मंदिर उभा केला. या मंदिराचा लोकार्पण सोहळा गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर चिरनेर गावातील मोकल परिवाराच्या वतीने श्री



सत्यनारायण पूजेचे आयोजन करुन माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून माजी आमदार मनोहरशेठ भोईर हस्ते शासकीय निधीतून निर्माण करण्यात येत असलेल्या रस्त्याचा शुभारंभ करण्यात आला.यावेळी श्री बापुजी देव मंदिर परिसराच्या सुशोभिकरणासाठी शासनस्तरावरून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी उपस्थित ग्रामस्थांनी माजी आमदार मनोहरशेठ भोईर व दानशूर व्यक्ती माजी सभापती भास्कर मोकल यांचा गौरव केला. या कार्यक्रमासाठी उद्योगपती राजाशेठ खारपाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, माजी सभापती भास्कर मोकल शेकापचे चिटणीस सुरेश पाटील,शिवधन पतपेढीचे चेअरमन गणेश म्हात्रे, तिरंगा पतपेढीचे चेअरमन अलंकार परदेशी,माजी उपसभापती शुभांगी म्हात्रे, ग्राहक संरक्षण कक्षाचे प्रमुख शशांक ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते अर्जुन मोकल, गजानन चौलकर ( सर), पोलीस पाटील संजय पाटील, आजी माजी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

# भाजपच्या अपप्रचाराला चोख प्रत्युत्तर द्या : चारुलता टोकस

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'भाजप काँग्रेस बाबत विविध माध्यमातून अपप्रचार करत आहे. महागाईच्या मुद्द्यावरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यासाठी भावनात्मक मुद्द्यांना उचलून धरत आहे. अशा या भाजपचे अपप्रचार रोखून त्यांना चोख प्रत्युत्तर द्या तसेच काँग्रेसने आजवर समाजातील सर्व स्तरातील लोकांसाठी केलेल्या कामाचे महत्व पटवून द्या. असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष चारुलता टोकस यांनी काँग्रेस कार्यकर्त्यांना केले.



कर्जत तालुक्यातील साळोख येथे काँग्रेसच्या सदस्य नोंदणी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी टोकस यांनी 'गाव पातळीवर बूथ कमिट्या नेमा तसेच त्यात महिलांना सुद्धा प्राधान्य द्या. डिजिटल नोंदणीवर भर द्या.' असे सांगितले . तर जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी 'शासकीय कार्यालयांमध्ये जाऊन जन-तेचे अडलेले प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्या.'अशा सूचना कार्यकर्त्यांना केल्या. तसेच यावेळेस १५ व्या वित्त आयोगातून मंजूर झालेल्या घरकुल योजनेत फसवणूक झालेले उपोषणकर्ते मारुती भुंडेरे यांचीही चारुलता टोकस आणि महेंद्र घरत यांनी भेट घेऊन त्यांची व्यथा जाणून घेतली आणि संबंधित शासकीय विभागाला संपर्क साधत समस्या सोडविण्यास सांगितले. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष चारुलता टोकस, अखलाक शिलोत्री, किरीट पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर, जिल्हा उपाध्यक्ष रियाज बुबेरे, जिल्हा सरचिटणीस प्रमोद राईलकर, माजी सरपंच आवेश जुवारी, तालुका अध्यक्ष मुकेश सुर्वे, उपाध्यक्ष हेमंत देशमुख, तालुका कार्याध्यक्ष संजय गवळी, व्यापारी फेडरेशन तालुका अध्यक्ष अरविंद कटारिया, साळोख ग्रामपंचायत सदस्या मनीषा शिनारे, ललिता कांबरी, इस्माईल दिवाण आदी कार्यकर्ते मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# ग्रामस्थ उत्सव मंडळाचा पुढाकार : माथेरान मध्ये जंगी कुस्त्यांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । माथेरान**

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या पवित्र गुढीपाडवा या नववर्षाच्या दिवशी पारंपरिक पद्धतीने ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या पुढाकाराने कुस्त्यांचे आयोजन करण्यात येत असते मागील दोन वर्षांच्या कोरोना काळात लॉक डाऊन मुळे सर्वच मंदिरे आणि सणवार सुध्दा करता आले नाहीत हे सगळं बंद असल्याने आता सर्वत्र अनलॉक केल्यानंतर सर्व व्यवहार सुरळीत सुरू आहेत.



माथेरान मध्ये दरवर्षी गुढीपाडवा या सणाच्या दिवशी श्रीराम मंदिराच्या आवारात जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात येते. राज्याच्या कानाकोपऱ्यातील पहेलवान याठिकाणी हजेरी लावून आपली कला आणि डावपेच दाखवतात. आज दि. २ एप्रिल रोजी गुढीपाडवा निमित्ताने कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होतेत्र

यावेळी ग्रामस्थ उत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पार्टे, विठ्ठल पवार, राजेश चौधरी, प्रदीप घावरे, अनंत शेलार यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली होती. तर आलेल्या कुस्तीगीर यांच्या बक्षिसात पहिल्यांदाच शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि काँग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते भास्कर शिंदे यांनी मंडळाच्या बक्षिसात आपली स्वतःची रक्कम देऊन कुस्तीगीर यांच्या बक्षिसात वाढ केल्यामुळे खऱ्या अर्थाने यावेळी कुस्त्या पाहण्यासाठी प्रेक्षकांना आनंद मिळाला. यावेळी माजी नगरसेवक संदिप शिंदे, प्रकाश सुतार, सामजिक कार्यकर्ते रघुनाथ कदम, योगेश जाधव,अनिस शेख, अमोल चौगुले यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी समालोचन अनिल नाईकडे आणि मंगेश मोरे यांनी केले.

# मालसई संघाने पटकावले कबड्डी स्पर्धेतील विजेतेपद

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

श्री.भैरवीनाथ क्रीडा मंडळ,मालसई ता.रोहे आयोजित पंचक्रोशी कबड्डी स्पर्धेतील अंतिम सामन्यात आपल्याच होम पिचवर अंतिम सामन्यात दमदार कामगिरी करून श्री.भैरवीनाथ मालसई-अ संघाने स्पर्धेतील विजेतेपद पटाकावून चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेचे उद्घाटन रोहा ता महिला अध्यक्ष प्रितम पाटील, अध्यक्ष जयवंत मुंढे, जेष्ठ नेते गजानन मालुसरे, युवा नेते महेश तुपकर, युवा कार्यकर्ते निशिकांत पाटील, गाव सल्लागार लिलाधर मालुसरे, सरपंच रसिका हेमंत मालुसरे, सदस्य उष्मिता अनिल आयरे भाऊ, सेक्रेटरी, रविंद्र मोहिते, गाव अध्यक्ष यशवंत तेलंगे, उपाध्यक्ष यशवंत मोहिते, मालुसरे, संतोष मालुसरे, शांताराम आयरे, नंदकुमार मालुसरे, एकनाथ मोहीते, यदुराम मालुसरे, नरेश तेलंगे, महेश मोहिते, चंद्रकांत मालुसरे, राहुल तेलंगे, परेश मालुसरे, सचिन मराठे, सागर मालुसरे, ज्ञानदेव तेलंगे आदी मान्यवरांसह मालसई ग्रामस्थ आणि श्री भैरवीनाथ क्रिडा मंडळाचे सर्व युवक उपस्थित होते

क्रीडाप्रेमी नागरिकांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेतील द्वितीय क्र.काळभैरवी वांदोली अ,तर तृतीय व चतुर्थ क्र.यशवंतखार ब व सोमेश्वर सोनगांव या संघांनी पटाकावले. स्पर्धेतील मालिकावीर म्हणून ओंकार तेलंगे, मालसई,उत्कृष्ट चढाई- अजिंक्य कडव वांदोली, उत्कृष्ट पक्कड-रोशन चव्हाण सोनगांव तर पब्लिक हिरो म्हणून कुमार धनावडे मालसई या खेळाडूंना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी श्री. भैरवनाथ मालसई क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

# प्रसाद सावंत यांच्या संकल्पनेतून माथेरानचा निसर्ग अवतरणार कॅनव्हासवर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

निसर्गरम्य माथेरानची ओळख साता समुद्रा पलिकडे पोहचावी या उदात्त हेतूने प्रसाद सावंत व दिशा क्लासेस यांच्या माध्यमातून दि.४ व ५ एप्रिल रोजी राष्ट्रीय पातळीवर भव्य निसर्ग चित्रण स्पर्धेच आयोजन माथेरान येथे करण्यात आले आहे, या स्पर्धेकरिता मोठ्या प्रमाणात चित्रकला प्रेमी येणार असल्याचे सावंत यांनी सांगितले, तसेच ही स्पर्धा पुर्णपणे विनामूल्य असणार आहे. कोरोना महामारी नंतर मानसिक तणाव दुर करण्यासाठी व सामान्य जनसामन्यात तसेच विद्यार्थी वर्गात कलेची रूची वाढवणे तसेच नवोदित कलावंतांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे हा या स्पर्धेचा मुळ उद्देश असल्याचे सावंत यांनी स्पष्ट केले.ह्या स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर एकूण ८० स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला असून मुंबई येथील सुप्रसिद्ध चित्रकार वैभव नाईक यांच्या हस्ते प्रात्यक्षिक होणार आहे तर या चित्रकलेचा परीक्षक म्हणून मुंबई येथील नामांकित चित्रकार वैभव नाईक तसेच पुणे येथील सुप्रसिद्ध चित्रकार अमित ढाणे हे काम पाहणार आहेत. पारितोषिक वितरण समारंभ दि.६ एप्रिल रोजी होणार असून प्रथम व द्वितीय तृतीय आणि उत्तेजनार्थ दोन पारितोषिक आणि सर्व विजेत्यांना मानधन म्हणून रोख रक्कम अनुक्रमे १० हजार, ७ हजार, ५ हजार आणि २ हजार उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहे तसेच येणा-या स्पर्धकांची राहण्याची सोय विनामुल्य केली जाणार असल्याचे प्रसाद सावंत यांनी सांगितले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल परिसरात शोभा यात्रा काढून नववर्षाचे जल्लोषात स्वागत

हजारोच्या संख्येने नागरिक पारंपारिक वेशात सहभागी झाले होते. या निमित्ताने विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ढोल ताशांच्या गजरात लेझिम पथक, विविध सांस्कृतिक कार्यक्रम आदींच्या द्वारे तसेच जनजागृती फलक हाती घेवून आबालवृद्ध यात सहभागी झाले होते. या शोभा यात्रेचे विविध ठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. तर अनेकांनी सरबत, आईस्क्रिम तसेच खाऊ, पेढ्यांचे वाटप केले. या शोभा यात्रेच्या निमित्ताने विविध स्पर्धा ठेवण्यात आल्या होत्या. त्याचा बक्षिस समारंभ पार पडला. अत्यंत उत्साहाच्या वातावरणात या शोभा यात्रा पार पडल्या. ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

## 'महाराष्ट्रातील पहिली बुलेट ट्रेन नागपूरला जायला हवी होती : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

तर मग मुंबईतील मेट्रो प्रकल्पाच्या कारशेडसाठी कांजूरमार्गमध्ये ओसाड पडलेली जमीन का देत नाही? मुंबईविषयी केंद्र सरकारला इतकं प्रेम आहे तर मग ही जमीन कारशेडसाठी का दिली नाही? ही जागा मिळाल्यास भविष्यात आपण मेट्रोचा विस्तार अंबरनाथपर्यंत करू शकतो. याशिवाय, पंपिंग स्टेशन आणि धारावीच्या पुनर्विकासासाठीही राज्य सरकार जागा मागत आहे, त्यासाठीही केंद्र सरकार जमीन का देत नाही, अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करत उद्धव ठाकरे यांनी भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. तसेच भाजप सरकारच्या काळात सुरु झालेले विकासाचे प्रकल्प आम्ही अडवून ठेवले नाहीत. तुम्ही सुरुवात केलेले प्रकल्प आम्ही पुढे नेले, असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी जीएसटी थकबाकीच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला लक्ष्य केले. महाराष्ट्राकडून केंद्र सरकारला सर्वाधिक जीएसटी जातो. पण त्यामधील हिस्सा द्यायचा प्रश्न येतो तेव्ही आमची मर्जी असेल तेव्हा आम्ही देऊ, असे केंद्राचे धोरण असल्याची टीका मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

## खोपोलीजवळ मलायका अरोराच्या गाडीला अपघात

उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मनसे कोल्हापूरचे संपर्क अध्यक्ष जयराज लांडगे यांनी मलायकाला रुग्णालयात दाखल केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र निर्माण सेनेच्या पदाधिकारी यांनी दिली. राज ठाकरे यांच्या सभेला पुण्यावरून मुंबईकडे आम्ही निघालो असताना खोपोलीजवळ बोरघाटात मलाइका अरोरा यांच्या गाडी वरील ड्रायव्हरचा ताबा सुटून मनसेच्या गाड्यांना अरोरा यांच्या गाडीने धडक दिली. या घटनेत त्यांच्या डोक्याला दुखापत झाली असून, मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला आहे. त्यांना नवी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जनहित संघटनेचे सरचिटणीस जयराज लांडगे यांनी प्रसंगावधान राखून अरोरा यांना स्वतच्या गाडीतुन तातडीने नवी मुबई येथील अपोलो हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यांच्यावरील उपचाराची सोय करुनच ते मुंबईकडे रवाना झाले.

## उलवे येथील भूखंड तिरुपती देवस्थानाला मंदिरासाठी देण्याचा प्रस्ताव सिडको राज्य शासनाला पाठवणार

करण्याची विनंती केली. त्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सिडकोस कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

सुब्बा रेड्डी, अध्यक्ष, तिरुमला तिरुपती देवस्थान, धर्मा रेड्डी, अतिरिक्त मुख्य अधिकारी, तिरुमला तिरुपती देवस्थान, तिरुमला तिरुपती देवस्थानचे विश्वस्त मिलिंद नार्वेकर, व श्री. सौरभ बोरा यांनी नवी मुंबईतील उपलब्ध भूखंडांची प्रत्यक्षात पाहणी केली. त्यानंतर वर्षा येथे झालेल्या बैठकीमध्ये उपलब्ध पर्यायांपैकी देवस्थानासाठी सुयोग्य भूखंड निवडण्याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार नवी मुंबईच्या सभोवतालच्या शहरांशी उत्तम कनेक्टिव्हिटी व आगामी आंतरराष्ट्रीय विमानतळापासून नजीकच्या अंतरावर असलेल्या उलवे नोडमधील भूखंड निश्चित करण्यात आला.

सदर भूखंड हा सिडकोतर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) एमटीएचएल प्रकल्पांतर्गत कास्टिंग यार्डकरिता लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्त्वावर वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचा भाग आहे. सिडकोने केलेल्या विनंतीनुसार एमएमआरडीएने त्यांना वाटप केलेल्या भूखंडाचा सिडकोकडे पुन्हा ताबा देण्यास मान्यता दिली आहे. मार्च ते सप्टेंबर २०२३ पर्यंत सिडकोतर्फे टप्प्या टप्प्याने या भूखंडाचा ताबा मिळणार आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाही नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतसमोर लिहिलेल्या मालक **१) श्री.अनिल जनार्दन केणी २) श्रीमती.मोहिनी राजेंद्र केणी ३) श्री.प्रसाद राजेंद्र केणी** हे अनुक्रमे त्यांचे सख्खा भाऊ, दिर, काका म्हणजेच आमचे अशिल नामे **श्री.सुधीर जनार्दन केणी** यांना बक्षिसपत्राने देणार आहेत. सदर मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड बक्षिसपत्र करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालकाचे नाव | संचिका क्र. | स्थळ | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.अनिल जनार्दन केणी<br>२) श्रीमती.मोहिनी राजेंद्र केणी<br>३) श्री.प्रसाद राजेंद्र केणी | CHMO-ICIG-225 | वडघर (पुष्पक नोड) | आर १ | २१ | १२० चौ.मी. (पैकी त्यांचा अविभाज्य हिस्सा) |

वर नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर बक्षिसपत्र पूर्ण करतील व सदरचे बक्षिसपत्र रजिस्टर्ड करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०४/२०२२

**सही/-**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**(अॅडव्होकेट हायकोर्ट)**
**शॉप नं.९, ए विंग, रचना रेसिडेन्सी, टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६१४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com



मा.खा.लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांच्या पनवेल निवासस्थानी गुढी उभारून गुढीपाडवा सण साजरा केला.

# गुढीपाडव्या निमित्त पालीत भव्य शोभा यात्रा

## भगवे झेंडे शिवकालीन खेळ, वेशभूषा, फुगड्या ढोलताशा व मिरवणूक

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

गुढीपाडव्या निमित्त शनिवारी (ता.२) पालीत भव्य शोभा यात्रा काढण्यात आली होती. यावेळी संपूर्ण पाली शहरात भगवे झेंडे लावण्यात आले होते. याबरोबरच शिवकालीन खेळ खेळले गेले. लहान व मोठ्यांनी पारंपरिक वेशभूषा केली, महिलांनी फुगड्या खेळल्या, ढोलताशा व मिरवणूक निघाली होती. शेकडो नागरिक या शोभायात्रेत उत्साहाने सहभागी झाले होते.

हिंदू नववर्ष स्वागत समिती, पाली तर्फे या शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेला बल्लाळेश्वर गणपती मंदिरापासून सुरुवात झाली. धनंजय गद्रे गुरुजी यांच्या हस्ते नारळ वाढवून कार्यक्रमास सुरुवात झाली. या शोभायात्रेत लाठीकाठी, तलवारबाजी, दांडपट्टा, विविध शिवकालीन खेळ दाखवण्यात आले. लहान मुलांनी देव देवता व थोर महिला आणि पुरुषांची वेशभूषा केली होती. हातामध्ये हिंदू धर्मातील विविध सणांची माहिती असलेले फलक घेऊन लहानगे सहभागी झाले होते. वीर गर्जना ढोलताशा पथकाने उत्तम सादरीकरण केले. लेझीम खेळली गेली. खालुचा बाजा देखील वाजविण्यात आला. महिला मंडळींनी यथेच्छ फुगड्या घातल्या. बहुतांश महिला व पुरुषांनी पारंपरिक वेशभूषा करून भगवे फेटे घातले होते. भगवे झेंडे सर्वत्र फडकत होते. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. आणि या शोभायात्रेची व कार्यक्रमाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौकात झाली. यावेळी महाराजांच्या पुतळ्याला पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काईंगडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या शोभायात्रेत पालीत नागरिकांनी आपल्या एकोप्याचे दर्शन घडविले.



# माथेरान महिला काँग्रेस तर्फे आयोजित मोफत साबण, अगरबत्ती प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान या दुर्गम भागात अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत आणि त्यातच विशेषकरून याठिकाणी उच्चशिक्षित महिला वर्ग सुध्दा मोठया प्रमाणावर आहे. व्यवसायाचे मुख्य स्त्रोत नसल्याने उच्च शिक्षण घेऊन देखील त्या आजच्या काळात एका सर्वसामान्य गृहिणीचे जीवन कंठीत आहेत. त्यामुळे एकप्रकारे त्यांची खऱ्या अर्थाने मुस्कटदाबी होत असते. निदान हाताला रोजगार निर्माण व्हावा जेणेकरून या वाढत्या महागाईच्या काळात आपल्या कुटुंबाला आधार देऊ शकतो याच विवंचनेत इथला महिला वर्ग त्याचप्रमाणे सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती येणाऱ्या दिवसांचा सामना करत असतात. याकामी येथील काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा सुनील शिंदे यांनी याचे अवलोकन करून कुठल्याही परिस्थितीत आमच्या स्थानिक महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हायला हव्यात त्यासाठी त्यांनी सुरुवातीला साबण व अगरबत्ती कशाप्रकारे बनविल्या जाऊ शकतात आणि त्याचे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध केल्यावर महिलांच्या हाताला रोजगार प्राप्त होऊ शकतो यासाठी एक दिवसीय शिबिराचे दि.३१ मार्च रोजी श्रीराम मंदिराच्या पटांगणात आयोजन केले होते. त्यावेळी शंभर पेक्षाही अधिक महिला व विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला.

महिला काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा सुनील शिंदे यांनी अत्यंत सोप्या पद्धतीने प्रशिक्षणाचे धडे दिले. साबण व अगरबत्ती बनवण्याचे प्रात्यक्षिक सादर केल्या नंतर महिलांनी स्वतः साबण व अगरबत्ती बनविल्या. साबण बनविल्यानंतर या शिबिरातून एक नवीन कला शिकायला मिळाल्याने सर्वांनी आनंद व्यक्त केला. माथेरान येथे जवळपास पन्नासच्या आसपास छोटी मोठी हॉटेल्स आहेत तर ५०० पेक्षाही अधिक प्रमाणात लॉजिंगचे रूम्स आहेत त्यांना छोट्या साबणांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासते त्यामुळे बचत गटाच्या माध्यमातून चांगला गृहोद्योग सारखाच स्वयंसेवी व्यवसाय



सुरु होऊ शकतो. घरगुती वापरासाठी देखील साबण बनवल्यास याच माध्यमातून आर्थिक बचत होऊ शकते. पियर्स सारखा साबण बाजारात ८५ रुपयांना खरेदी होते तोच साबण स्वतः बनवल्यास २५ रुपयांत बनतो.

अवघ्या अडीचशे रुपयात एक हजार अगरबत्तीच्या सुगंधित काड्या बनतात. याचे देखील प्रात्यक्षिक वर्षा शिंदे यांनी दाखवले व महिलांनी स्वतः सुध्दा त्याठिकाणी स्वतःहून अगरबत्त्या बनविल्या. शिबिरात आयोजकांकडून प्रशिक्षणासाठी संपूर्ण साहित्य मोफत पुरवण्यात आले. रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार या आनंदाने साक्षी सुरेश शिंदे यांनी सर्वांच्या वतीने वर्षा शिंदे यांचे उत्तम प्रशिक्षण दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. प्रा. गव्हाणकर शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, मीरा फौंडेशनच्या अध्यक्षा रेखा चंद्रकांत चौधरी ,भाजपच्या नगरसेविका प्रतिभा घावरे, राष्ट्रवादी महिला आघाडीच्या अध्यक्षा स्वाती कुमार, सामाजिक कार्यकर्त्या स्मिता गायकवाड , सुहासिनी शिंदे, यांनी सुध्दा आवर्जून या महत्वपूर्ण शिबिराला भेट दिली. कांचन केतकर व श्रीराम मंदिर ट्रस्टने या कामात महत्वपूर्ण मदत केली. काँग्रेस पक्षाच्या चिटणीस सुहासिनी दाभेकर, उप चिटणीस श्रद्धा रामाणे , कार्यकारणी सदस्या शुभांगी शिंदे, अर्चना भिलारे, निकिता देशमुख, गिरीजा शिंदे, साक्षी कदम, कविता रेनोसे, यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेल येथील श्री स्वामी समर्थ मठ मंदिरात प्रगट दिन सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील गावदेवी मंदिराजवळील श्री स्वामी समर्थ मठ मंदिरात सालाबादा प्रमाणे यंदाही श्री स्वामी समर्थ प्रगट दिन सोहळा दिनांक ३ एप्रिल २०२२ रोजी स्वामी सेवक मोठ्या उत्साहात साजरा करणार आहेत.

यानिमित्ताने सकाळी ५.०० श्री स्वामी समर्थ ची काकड आरती, सकाळी ७.०० नैमित्तिक पूजा, सकाळी ८.३० लघुरुद्र, सकाळी ११.०० गुरुपाद्य पूजा, सकाळी ११.३० श्री स्वामी समर्थ प्रगट दीन पोथी वाचन, सकाळी ११.५० स्वामी प्रगट दीन, आनंदी उस्तव सोहळा, दुपारी २.०० श्री दत्त गायत्री होम, दुपारी ४.०० श्री स्वामी समर्थ महिला भजन मंडळ यांचे भजन, संध्याकाळी ५.०० श्री गुरुवर्य मठाधिपती भाऊ यांचे श्रवणीय प्रवचन, संध्याकाळी ६.४५ महाआरती, संध्याकाळी ७.३० महाप्रसाद, आगरी समाज हॉल पनवेल, रात्री १० ते १.०० भजन संध्या, भजन रत्न ह. भ. प. श्री महादेव बुवा शहाबजकर व इतर सन्मानित व आमंत्रित भजन कलाकार उपस्थित राहणार असल्याची माहिती मठाधिपती सुधाकर(भाऊ)घरत यांनी दिली आहे

# श्री खंडोबा मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेरेपाडा येथे नवीन मंदिरात श्री खंडोबा मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा ५ एप्रिल आणि ६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी भजन, कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी होम विधी, पालखी सोहळा, भजन, महिला भजन, संगीत भजन आयोजित करण्यात आले आहे. ६ एप्रिल रोजी खंडोबा मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार आहे. या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन गोटीराम माया म्हात्रे यांनी केले आहे.

# संक्षिप्त...

## गुढीपाडव्याचे औचित्य साधून क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गुढीपाडव्याचे औचित्य साधून ई वन मित्र मंडळ आयोजित ई वन स्टार प्रीमियर लीग क्रिकेट चे सामन्याचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महानगर प्रमुख रामदास शेवाळे विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, उपमहानगर संघटक आत्माराम गावंड, कळंबोली शहर समन्वयक गिरीश धुमाळ, शहर संघटक अरविंद कडव, उपशहर प्रमुख सूर्यकांत म्हसकर, नारायण फडतरे, महिला आघाडीच्या उपतालुका संघटीका सौ. टिया धुमाळ, उपविभाग संघटक पंडित विकास मिश्रा आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत पनवेलच्या शुभंकर पाटीलचे सुयश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील महाड याठिकाणी नुकतीच राष्ट्रीय फिल्ड इनडोअर आर्चरी स्पर्धा पार पडली.विविध गटात पार पडलेल्या या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.या स्पर्धेत पनवेलच्या शुभंकर अमित पाटील याने यश प्राप्त करीत तीन पदक प्राप्त केले आहेत. महाडचे आमदार भरत गोगावले यांनी या ११,१२ व्या राष्ट्रीय आर्चर स्पर्धा आयोजित केल्या होत्या.या स्पर्धेत शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला.या स्पर्धेत तीन गटात शुभंकर ने पदक प्राप्त केली.यावेळी १९ वयोगटाच्या राष्ट्रीय स्पर्धेत गोल्ड तर १७ वयोगट सिल्वर असे दोन पदक प्राप्त केले आहेत.या व्यतिरिक्त ग्रुप स्पर्धेत देखील दोन पदक शुभंकरने प्राप्त केले आहेत.शुभंकर हा पनवेल शहरातील तालुका क्रीडा संकुलात आर्चरी चा सराव करीत असे .भविष्यात आंतराष्ट्रीय स्पर्धेत भारताचे आर्चरी मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मानस यावेळी शुभंकरने व्यक्त केला आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# जेएनपीए विरोधात आमरण उपोषणाच्या तेरा दिवसांनंतरही तोडगा नाही

## प्रकृती खालावल्यानंतरही न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याच्या निर्धारावर निशांत घरत ठाम



**दै.रायगड नगरी । उरण**

विविध मागण्यांसाठी मागील तेरा दिवसांपासून नवीन शेवा गावचे माजी सरपंच निशांत घरत यांनी जेएनपीए विरोधात सुरू केलेल्या आमरण उपोषणावर चर्चेनंतर अद्यापही सकारात्मक तोडगा निघालेला नाही.मात्र प्रकृती खालावल्यानंतरही न्याय मिळेपर्यंत उपोषण सूरुच ठेवण्याचा निर्धार काल २ एप्रिल रोजी उपोषणकर्ते निशांत घरत यांनी पत्रकार परिषदेतून जाहीर केला आहे. शिवसेना, काँगेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, आम आदमी पार्टी यांच्या पाठिंब्यावर नविनशेवा गावचे माजी सरपंच निशांत घरत यांनी जेएनपीए व्यवस्थापना विरोधात विविध मागण्यांसाठी आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

नवीन शेवा पुर्नवसित गावाला शासन निर्णयानुसार ३३ हेक्टर जागा देण्यात यावी, वाढीव गावठाण मंजूर करावे, जेएनपीए प्रकल्पग्रस्त आणि उरण तालुक्यातील स्थानिक भूमी पुत्रांना सेझ, खासगी बंदरात नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे, चुकीच्या कागदपत्रांच्या आधारावर जेएनपीटी मध्ये नोकरी मिळवणाऱ्या मनिषा जाधव यांच्यावर कारवाई करण्यात यावी आदी मागण्यांसाठी निशांत घरत यांनी कासव चौकात मागील तेरा दिवसांपासून आमरण सुरू केले आहे.

या उपोषणाची दखल घेत जेएनपीएचे वरिष्ठ प्रबंधक जयंत ढवळे,उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, न्हावा- शेवा बंदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी उपोषणकर्ते निशांत घरत यांची भेट घेतली.यावेळी कामगार नेते तथा ट्रस्टी दिनेश पाटील, भूषण पाटील, रविंद्र पाटील, संतोष पवार, प्रमोद ठाकूर, राजेंद्र मढवी आदी उपस्थित होते.या भेटीत विविध माण्यांवर चर्चा झाली.

मात्र सकारात्मक तोडगा निघाला नसल्याने आमरण उपोषण तेराव्या दिवशीही सुरूच आहे.या उपोषणाची माहिती देण्यासाठी काल निशांत घरत आणि त्यांच्या समर्थकांनी पत्रकार परिषद आयोजित केली होती.

पत्रकारांना माहिती देताना प्रकृती खालावली असतानाही न्याय आणि सकारात्मक तोडगा निघेपर्यंत आमरण उपोषण सुरुच ठेवण्याचा निर्धार उपोषणकर्ते निशांत घरत यांनी पत्रकार परिषदेतून व्यक्त केला आहे.

# नागोठणे पोलिसांकडून वाघ्रणवाडी जंगलातील गावठी दारूच्या दोन हातभट्टी उद्ध्वस्त

## एक हजार लिटर गुळमिश्रित रसायनही केले नष्ट

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दितील चेराठी, काळकाई जंगल परिसरात धाड टाकून तेथील गावठी दारूच्या चार हातभट्टी नागोठणे पोलिसांनी उध्वस्त केल्याची घटना ताजी असतांनाच नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दितील वाघ्रणवाडी पश्चिम व उत्तर दिशा जंगल परिसरात धाड टाकून तेथील गावठी दारूच्या दोन हातभट्टी उध्वस्त करण्याची मोहिम नागोठणे पोलिसांनी फत्ते केल्याने गावठी दारु माफियांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिसांच्या पथकाने गुरूवारी (दि.३१) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई केली.

नागोठणे परिसरातील जंगलांचा फायदा उचलत फोफावत चाललेल्या गावठी दारु तयार करणाऱ्या हातभट्टींना नष्ट करण्याची मोहिम नागोठण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांनी येथील पदभार स्वीकारल्यापासून हाती घेतलीवहोती. त्यातच नागोठण्याजवळील ऐनघर, सुकेळी परिसरात गावठी दारूचे धंदे तेजीत आल्याच्या व त्यामुळे तरुण पिढी गावठी दारूच्या आहारी जाऊन अनेकांचे संसार उध्वस्त झाल्याचे चित्र निर्माण झाले होते. असे असतांनाच वाघ्रणवाडी जंगल परिसरात गावठी दारूच्या हातभट्टी पेटवून गावठी दारु तयार करीत असल्याची गुप्त माहिती खबरीकडून नागोठणे पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे नागोठणे पोलिसांनी केलेल्या या कारवाईत प्लास्टिकच्या ३ ड्रम मध्ये प्रत्येकी २०० लिटर प्रमाणे ६०० लिटर क्षमतेचे व सुमारे रु. २४ हजार किंमतीचे गुळ मिश्रित रसायन व २ लोखंडी टाक्यांमध्ये ४०० लिटर क्षमतेचे सुमारे १६ हजार किंमतीचे असे एकूण ४० हजार रुपये किंमतीचे १ हजार लिटर गुळ व नवसार मिश्रित रसायन सापडले. सापडलेला मुद्देमाल वाहतुकीस अवजड व अवघड असल्याने नागोठणे पोलिस पथकाकडून तो जागेवरच पेटवून नष्ट करण्यात आला.

नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस ठाण्यातील ठाणे अंमलदार व पोलिस पथकाने ही कौतुकास्पद कामगिरी केली आहे. नागोठणे पोलिस ठाण्याच्या या पथकात हे.कॉ. चंद्रकांत पाटील, हे.कॉ. विनोद पाटील, पोलिस नाईक निलेश कोंडार, पो.कॉ. रामनाथ ठाकूर, पो.कॉ. निशांत पिंगळे यांच्यासह होमगार्ड देवरे, डोबळे, भोईर, बांगरे, दरोडे, हंबीर आदींचा समावेश होता.

नागोठणे पोलिसांनी गावठी दारु विरोधात केलेल्या या कारवाईचे नागरिकांतून स्वागत करण्यात येत असून या गावठी दारु धंदेवाल्यांचा पोलिसांनी कायमचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

# तमनाथ सोसायटीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शेकाप आघाडीचे वर्चस्व

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या तमनाथ सोसायटीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शेकाप आघाडीचे वर्चस्व, नवनिर्वाचित चेअरमनपदी परशुराम घारे व उप चेअरमनपदी उत्तम भोईर यांची निवड करण्यात आली आहे.



कर्जत तालुक्यातील प्रतिष्ठित असणारी तमनाथ सोसायटीची निवडणूक काही दिवसांपूर्वी बिनविरोध झाली होती, परंतु सोसायटीच्या चेअरमन व उप चेअरमनपदाची निवडणूक बाकी होती, सदरील निवडणूक प्रक्रिया आज पार पडली, या मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व शेकाप आघाडीकडून परशुराम कुशाबा घारे व उत्तम बाळू भोईर यांचे नामांकन भरण्यात आले, त्यांच्या विरोधात शिव-सेना व बीजेपी युतीकडून सतिश आत्माराम बोराडे व जगन्नाथ दामोदर पाटील यांचे नामांकन भरण्यात आले होते. सदरील निवडणूक प्रकिया पार पडल्यानंतर आघाडीचे परशुराम घारे व उत्तम भोईर यांची मोठ्या फरकाने निवड झाली व पुन्हा एकदा तमनाथ सोसायटीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व शेकाप आघाडीचे वर्चस्व सिद्ध झाले.

# आदिवासी कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून दिल्यास स्थलांतर रोखण्यास मदत होईल : समीर घारे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील संदेरी आदिवासीवाडी येथे नागरिकांना विविध शासकीय दाखले वाटप आणि मच्छीमारी करण्यासाठी होडीची व्यवस्था या कार्यक्रमाचे आयोजन तालुक्याचे तहसीलदार समीर घारे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.

यावेळी तहसीलदार समीर घारे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की माननीय जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा तालुक्यात कातकरी उत्थान अभियानाअंतर्गत सप्तसूत्री कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आदिवासी व्यक्तींचे स्थलांतर रोखण्यासाठी त्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्याकरिता सर्व दीप विकास संस्था माणगाव यांच्या माध्यमातून कातकरी व्यक्तींना संदेरी येथे मासेमारी व्यवसायासाठी होडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून या होडीचा वापर करून करण्यात येणाऱ्या मासेमारीमुळे संदेरी आदिवासीवाडीतील दहा कुटुंबांना रोजगार मिळणार असून त्यामुळे त्यांचे स्थलांतर रोखण्यास मदत होईल असे सांगून तहसीलदार घारे यांनी सर्व दीप विकास संस्था माणगाव यांचे लोकोपयोगी कामांचे कौतुक केले. तसेच तहसीलदार यांचे हस्ते होडी ची विधिवत पूजा करण्यात आली.

कार्यक्रमाचे दरम्यान आदिवासी नागरिकांना विविध प्रकारचे शासकीय दाखल्यांचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्यावेळी म्हसळा तहसीलदार समीर घारे, मंडळ अधिकारी सलीम शहा, तलाठी जितेंद्र शेळके, रा.भा. दुकानदार बिलाल हजवाने, सर्व दीप विकास संस्थेचे पदाधिकारी, संदेरी आदिवासीवाडीतील गाव अध्यक्ष, महिला मंडळाचे अध्यक्ष, इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## कै. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य जे.एम. म्हात्रे व प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य, रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष महेंद्र घरत हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी थोडक्यात प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविका मध्ये त्यांनी रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांचे जीवन कार्य व गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी केलेला त्याग याबद्दल माहिती सांगितली तसेच महाविद्यालयाची उत्तरोत्तर होत गेलेली प्रगती थोडक्यात प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महेंद्र घरत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की रयत शिक्षण संस्था हि ख-या अर्थाने रयत माउली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या त्यागातून उभी राहिली आहे. त्या माउलीने स्वताचे दागिने मोडून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले. त्या माउलीच्या आदर्शावर आपण सर्वांनी चालले पाहिजे. समाजाचे आपण खूप ऋणी आहोत त्याची फेड आपण केली पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलताना.जे.एम.म्हात्रे यांनी रयत माउलीचे आपणा सर्वावर खूप उपकार आहेत. त्या माउलीचा त्याग पाहता आपण किती छोट्या छोट्या गोष्टीसाठी नाराज होतो. माणूस ख-या अर्थाने त्यागातूनच मोठा होतो. आपण सेवाभावी वृत्ती ठेवून काम करीत रीहीलो तर मोठे पण नक्की मिळते. बक्षीस पात्र यशस्वी विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी सांगितले की मोठे होण्यासाठी प्रामाणिक मेहनतीची गरज असते. त्यासाठी प्रामाणिक कष्ट करा व आपले नाव मोठे करा. असे मत त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

## नववर्षाच्या स्वागतासाठी कर्जतमध्ये स्वागतयात्रा, गुढीपाडवा उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । कर्जत**

मराठी नववर्षाच्या स्वागताचा सण म्हणजे गुढीपाडव्या निमित्त कर्जत मधील अनेक संस्था एकत्र येऊन कर्जत शहरात मराठी नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील बहुतांश गावात गुढ्या उभारून गुढीपाडवा उत्साहात साजरा करण्यात आला.

कपालेश्वर देवस्थान समिती, सार्वजनिक गणेशोत्सव समिती, शिवतांडव प्रतिष्ठान ढोल ताशा पथक,विश्वहिंदू परिषद, बजरंग दल, वारकरी सांप्रदाय कर्जत वनवासी कल्याण आश्रम दिंडी, सह्याद्री प्रतिष्ठान, संस्कार भारती, कर्जत महिला मंडळाचे विद्या विकास मंदिर आदींनी एकत्र येऊन स्वागत यात्रेचे आयोजन केले होते.



टिळक चौकातून या स्वागतयात्रेचा शुभारंभ करण्यात आला.या शोभायात्रेत साईनाथ श्रीखंडे, विनायक उपाध्ये, अभिजित मराठे, विशाल जोशी, भारती म्हसे, सुधिर साळोखे, राजाभाऊ कोठारी, विनायक चितळे, वनिता म्हसे, पद्माकर गांगल, मंदार मेहेंदळे, उल्हास दाबके आदीं सह नगरसेवक, नगरसेविका, कर्जतकर मोठ्या संखेने उपस्थित होते.

ही स्वागत यात्रा कर्जत शहरातील मुख्य बाजार पेठ, छत्रपती शिवाजी महाराज चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे पुन्हा टिळक चौकात आली आणि तेथे सांगता करण्यात आली. या स्वागत यात्रेत ढोल पथकांनी उपस्थितांचे मन जिंकले.

विशेषतः महिलांनी ढोल वाजवून आपली चमक दाखवून दिली तर वारकरी सांप्रदायने भजने गाऊन जुनी परंपरा चालू ठेवली. गावा गावात घरो घरी गुढ्या उभारून नव वर्षाचे स्वागत करण्यात आले.

## माथेरानमध्ये शिवसेना शाखेवर उभारली गुढी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असणाऱ्या पवित्र अशा गुढीपाडवा सणानिमित्त समस्त शिवसैनिकांनी शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी आणि महिला आघाडीच्या संघटीका संगीता जांभळे यांच्या उपस्थितीत शिव-सेना शाखेवर कार्यकर्त्यांच्या एकतेची, संघटनेतील निष्ठावंत सदस्यांच्या एकोप्याची गुढी उभारली.

यावेळी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, उप शहर प्रमुख प्रमोद नायक, माजी नगरसेवक संदिप शिंदे, प्रकाश सुतार, मनोहर रांजाणे,जेष्ठ शिवसैनिक योगेश जाधव, मनोहर रांजाणे, रवि बिरामणे, उमेश कदम, युवा सेनेचे गौरंग वाघेला, अमोल चौगुले, निखिल शिंदे, अनिकेत जाधव, शैलेश वाघेला, मयूर कदम, चैतन्य शिंदे, रेखा चौधरी, शलाखा शेलार, सौ.श्रुतिका दाभेकर, सौ. सुहासिनी शिंदे, सौ.अर्चना बिरामने, सुजाता जाधव, युवती सेनेच्या धडाडीच्या कार्यकर्त्या ऐश्वर्या शिंदे, अंकिता तोरणे, आदी उपस्थित होते. यावेळी चंद्रकांत चौधरी यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले




की, आगामी काळात नगरपरिषदेच्या निवडणुकीत निश्चितपणे आपण २०१६ च्या निवडणुकी प्रमाणेच पुन्हा एकदा स्वबळावरच सत्ता स्थापन करणार आहोत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी असेच संघटीत राहून पक्षाशी कायमस्वरूपी एकनिष्ठ राहावे.

## मोटारसायकल रॅलीने मुरुडमध्ये मराठी नववर्षाचे जल्लोषात स्वागत

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

चैत्र शुद्ध प्रतिपदा १ वसंतऋतू प्रारंभ, शुभकृत्नाम संवत्सर प्रारंभ, गुढीपाडवा म्हणजेच मराठी नव वर्ष आरंभ होतो. या मराठी नविन वर्षाच्या स्वागतासाठी मराठी तरुण, तरुणी मिळुन मुरुड शहरात मोटारसायकल रॅलीचे आयोजन करुन वातावरण निर्मिती केली.

मुरुडची ग्रामदेवता श्री कोटेश्वरी माता मंदिरात सर्व जण एकत्र येऊन प्रथम दर्शन घेऊन या रॅलीला आरंभ करण्यात आला. कोटेश्वरी मंदिर, मारुती नाका, मुरुड शहर बाजारपेठेतून संपूर्ण शहरात मोटारसायकल रॅली काढून सर्व हिंदू बांधवांना मराठी नवीन वर्षाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करत, जय श्रीराम घोषणा देत वातावरण निर्मिती केली. या नविन वर्षाच्या स्वागतासाठी मुरुडच्या माजी नगराध्यक्षा सौ स्नेहा पाटील, प्रमोद भायदे, कृणाल सतविडकर, प्रशांत कासेकर, अशिल ठाकुर, अलंकार भोसले, आदेश दांडेकर, विजय वाणी, युगा ठाकुर, महेंद्र मोहिते, सुनील शेळके, रुपेश जामकर, राहुल कासार आदी. तरुण, तरुणींनी सहभाग घेतला.



## केदार भगत आयोजित गुढीपाडवा शोभायात्रेस ज्युस वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातून आज मोठ्या दिमाखादार पद्धतीने निघालेल्या गुढी पाडवा शोभा यात्रेमध्ये युवा नेतृत्व केदार भगत व त्यांच्या सहकाऱ्यांनी या शोभा यात्रेत सहभागी झालेल्या पनवेलकरांना मोठ्या प्रमाणात विविध फळ्यांच्या रसाचे वाटप केले.

यावेळी केदार भगत मित्र परिवार, सह्याद्री मित्र मंडळ व जय महाराष्ट्र संघ संपर्कप्रमुख केदार भगत आयोजित केलेल्या विविध फळांच्या वाटपाच्या वेळी युवा नेते केदार भगत यांच्यासह सचिन भगत, सुमित दसवंते, संकेत दसवते,



प्रमोद भगत, नितेश भगत, सचिन जाचक, जयेश भगत, शेषनाथ गायकर, महेंद्र पाटील, योगेश साळवी, भावेश शिंदे, संतोष वर्तले, गीतांजली भगत, अनिता गायकर, निर्मिती म्हसकर, यज्ञेश पाटील, अथर्व पाटील आदी उपस्थित होते.

## मनसेतर्फे सार्वजनिक शौचालयाचे भूमिपुजन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

छत्रपती शिवाजी महाराज चौकासमोरील सार्वजनिक शौचालय पनवेल पालिकेने दोन दिवसांपूर्वी पाडले. सार्वजनिक शौचालय पाडल्याच्या निषेधार्थ पनवेल मनसेने त्याच ठिकाणी नवीन शौचालयाचा भूमिपूजन सोहळा आयोजित केला होता.

गुढीपाडव्याच्या दिवशी २ एप्रिल रोजी सार्वजनिक शौचालयाच्या ठिकाणी श्रीफळ फोडून शौचालयाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मनसेचे योगेश चिले, पराग बालड, संजय मिरकुटे, महिला अध्यक्ष आदिती सोनार, अनिकेत मोहिते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक शिवदास कांबळे उपस्थित होते.

## शेवटच्या दिवशी मालमत्ता करापोटी पनवेलकरांनी भरले साडेपाच कोटी

### मालमत्ता करावरील सवलतीची मुदत संपुष्टात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३१ मार्च हि मालमत्ता कर भरण्यासाठी तसेच शास्ती टाळण्यासाठी महानगरपालिकेने मालमत्ता धारकांना अंतिम मुदत दिली होती. या नंतरच्या काळापासून नागरिकांना दंडापोटी शास्ती भरावी लागणार आहे.शेवटच्या दिवशी पालिकेच्या तिजोरीत सुमारे साडेपाच कोटी जमा झाले आहेत.

> शास्ती हि आपोआपच लागत असते. कायद्यातील तरतुदी नुसार इतर महानगरपालिकाप्रमाणे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात त्याची अंमलबजावणी झाली आहे. करदात्यांसाठी प्रशासन नेहमीच सकारात्मक राहिले आहे. भविष्यात देखील राहील. मात्र नागरिकांनी कर न भरता केवळ शास्ती माफीची मागणी करणे योग्य नाही. करदात्यांनी शासनाच्या नियमानुसार कर भरावा, शास्ती बाबत सकारात्मक व धोरणात्मक काय निर्णय घेता येईल, याबाबत प्रशासन नक्कीच सकारात्मक आहे.
>
> **- गणेश देशमुख (आयुक्त, पनवेल महानगरपालिका )**

पालिका अधिनियमानुसार मालमत्ता कर हे प्रत्येक नागरिकाला बंधनकारक आहे. याकरिता पालिकेच्या महासभेतच नगरसेवकांच्या उपस्थितीत मालमत्ता कर प्रणाली लागु झाली. त्यानुसार नागरिकांना मालमत्ता कर भरण्याचे अवाहन पालिका प्रशासन वेळोवेळी करीत आले आहे. ३१ मार्च २०२२ नंतर मालमत्ता करावर शास्ती लागू होणार आहे. यापूर्वी मालमत्ता कर भारण्यासाठी पालिका प्रशासनाने नागरिकांनी काही सवलती लागु केल्या होत्या. या सवलतीचा लाभ देखील पालिका क्षेत्रातील कर दात्यांनी घेतला आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या सहा दिवसात दि.२५ ते ३१ दरम्यान पालिकेच्या तिजोरीत सुमारे साडेदहा कोटींचा मालमत्ता कर जमा झाला असल्याची माहिती उपायुक्त गणेश शेटे यांनी दिली. ऑनलाईन मालमत्ता कर भरण्याचे प्रमाणही मोठे आहे. पालिकेच्या PMC TAX या अप्लिकेशन द्वारे सुमारे ६९९३ कर दात्यांनी १ कोटी ५४ लाखांच्या आसपास मालमत्ता कर पालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. शहरी भागात मालमत्ता कर प्रणाली लागु केल्यानंतर पालिका क्षेत्रातील ग्रामीण भागात देखील मालमत्ता कराची बिले वाटपाचे काम काही दिवसात सुरु होणार आहे. शहरी भागातील मालमत्ता कराचे बिल वितरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर ग्रामीण भागात बिले वितरित होणार आहेत.ग्रामीण भागातील नागरिकांना देखील मालमत्ता करात सवलती दिल्या जाणार आहेत. त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे अवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. मालमत्ता करावरून पालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात राजकारण सुरु आहे. मालमत्ता कर भरूच नका असे अवाहन अनेक जण करीत आहेत.मात्र यामुळे करदात्यांचे मोठे नुकसान होत आहे.वेळेत कर भरल्यास पालिकेने अनेक सवलती नागरिकांना देऊ केल्या होत्या त्या सवलतींचा लाभ न घेतल्याने अनेकांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

## मराठी भाषा भवनामुळे मराठीची श्रीमंती जगाला कळावी : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**मुंबईत येणारा प्रत्येक पर्यटक मराठी भाषा भवन पहायला यावा, त्याला मराठीची श्रीमंती कळावी, मराठी भाषेचा खजिना किती मोठा आहे हे त्याला कळावे, देशातीलच नव्हे तर परदेशा-तील माणसं ही कामं पहायला यावीत, एखाद्या मातृभाषेचं मंदिर कसे असावे हे इथं येऊन कळावे असे जगातील सर्वोत्तम भवन उभे रहावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली.**

मरिन ड्राइव्ह समोरील चर्नी रोड येथील मराठी भाषा भवनाचे भूमीपूजन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, मुंबई शहर जिल्ह्याचे पालक मंत्री अस्लम शेख, मराठी भाषा विभागाचे राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, खासदार अरविंद सावंत, खासदार अनिल देसाई, राहुल शेवाळे, आमदार दिवाकर रावते, सुनिल शिंदे, आशिष शेलार, मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव, मराठी भाषा विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मराठी भाषा भवनचे भूमिपूजन आणि फलकाचे अनावरण करण्यात आले.

उपस्थित जनसमुदायाला गुढीपाडव्याच्या आणि नववर्षांच्या शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, हे भवन केवळ मराठी भाषा भवन नसून ते आपल्या मातृभाषेचे मंदीर आहे. आज या शुभमुहुर्तावर आपल्या मातृभाषेच्या मंदिराचे भूमिपूजन करत आहोत. याचा आनंद, समाधान आहे. जबाबदाऱ्या पार पाडतांना काही जबाबदाऱ्या आयुष्याचं सार्थक झाल्याचा आनंद देणाऱ्या असतात. आजची



जबाबदारी माझ्यासाठी अशीच माझ्या जीवनाचे सार्थक झाल्याचा आनंद देणारी घटना आहे.

मराठी भाषेच्या वाटचालीचा उल्लेख करतांना मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, मराठी माणुस म्हटलं की संघर्ष आलाच. भाषेनुसार प्रांतरचना झाली मात्र महाराष्ट्राला मुंबई ही रक्त सांडून, लढून मिळावावी लागली हा इतिहास आहे. त्याचे स्मारकही येथे जवळच आहे. जो इतिहास विसरतो त्याला भविष्य राहात नाही. मुंबईसाठी ज्यांचे आजोबा लढले, मुंबई मिळाल्यानंतर मराठी माणसाचा आवाज बुलंद करण्याचा काम ज्यांनी केले. त्यांच्यासाठी मराठी भाषा भवन तयार करण्याची बाब अभिमानाची आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराची भाषा स्वभाषाच हवी हे ठणकावून सांगितले. एवढेच नाही तर राज्य व्यवहार कोश तयार करण्याची सूचनाही त्यांनी केली. शिवाजी महाराजांनी त्यांचे खलितेही सोप्या भाषेत केले. इतर भाषेचा द्वेष नको पण त्यांचे आक्रमणही नको. कर्नाटकात मराठी भाषिकांवरचे अत्याचार सहन करायचे ना-हीत. त्यांच्यावरील भाषिक अत्याचार खपवून घेतले जाणार नाही, सहन करणार नाही. छत्रपतींच्या तलवारीप्रमाणे मराठी भाषा आणि या भाषेचे तेज तळपले पाहिजे महाराष्ट्राच्या छत्रपतींच्या मातृभाषेचे हे मंदिर आहे. याचे काम करतांना कुठलीही कमतरता नसावी असे निर्देशही श्री.ठाकरे यांनी दिले.

भाषा हे संस्कृतीचे प्रवाही रुप आहे. भाषा प्रवाही असली पाहिजे. त्यासाठी इतर भाषेतल्या शब्दांना सामावून घ्यावे लागेल. ती मानसिकताही तयार करावी लागेल. केवळ एकमेकांशी मराठीत बोलण्याने मराठी भाषेचं संवर्धन होईल. हीसुद्धा एक भाबडी आशा आहे. मात्र हे सर्व करत एक ठोस कृती कार्यक्रम तयार करावा लागेल. केवळ सरकारवर सगळं सोडून चालणार नाही. समाज म्हणून प्रत्येकाने यामध्ये सक्रीय सहभाग दिला पाहिजे. असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिपादन केले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, कोणतीही भाषा नुसती ओठातून येवून उपयोग नाही तर ती पोटातून आली पाहिजे. कोणतीही भाषा टिकायची असेल तर, ती भाषा बोलणाऱ्याचं पोट भरण्याचे सामर्थ्य, त्या भाषेत असणे आवश्यक असते. त्यासाठी ती उद्योगाची, रोजगाराची भाषा असणे आवश्यक आहे. मराठी भाषा ही उद्योगाची व्हावी, यासाठी शासनाबरोबरच आपण सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत.

मराठी भाषेच्या संरक्षण, संवर्धनासाठी, आपण अनेक माध्यमातून प्रयत्न करत आहोत. यावर्षीच्या अर्थसंकल्पात मराठी भाषेच्या संवर्धनासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मुंबईत 'मराठी भाषा भवन' उभारण्याचा निर्णय अर्थसंकल्पात जाहीर केला आणि आज त्याचे भूमीपूजन होत आहे, याचा आपल्या सगळ्यांना आनंद आहे.

आज भूमीपूजन होत असलेले मराठी भाषा भवन, नियोजित वेळेत पुर्ण होईल. मराठी भाषेच्या बरोबरीने, मराठी अस्मिता, मराठी संस्कृती, मराठी अभिमान, मराठी स्वाभिमान जिवंत ठेवण्यात, वाढवण्यात हे मराठी भाषा भवन येणाऱ्या काळात महत्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

## तिसे शाळेत विद्यार्थ्यांना कोरोना लसिकरण मोहिम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील तिसे शाळेत प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी मार्फत १२ वर्षावरील विद्यार्थ्यांना कोरोनो लसिकरण करण्यात आले.

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. वारे, डॉ. गायकवाड. व आरोग्य सैविका मखर सिस्टर व आशावर्कर सौ.कदम मँडम यांनी उपस्थिती दर्शवून योग्य प्रकारे १२ वर्षावरील विद्याथ्यांचे लसिकरण पूर्ण केले.

कोरोना लसिकरणासाठी शाळेत आल्याबद्दल व डॉ. वारे आपली प्रदिर्घ ३७ वर्षांची आरोग्यसेवा करून दि.३० मार्च २०२२ ला सेवेतून निवृत्त होत असल्याने तिसे केंद्रीय शाळेकडून मा.मुख्याध्यापक कापसेसर यांचेहस्ते त्यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. तसेच उपस्थित डॉ. गायकवाड व मखर यांचाही सत्कार करण्यात आला. कापसेसर यांनी डॉ. वारे याना शुभेच्छा दील्या. व वारे डॉ. यांनी आपल्या मनोगतात आपण केलेल्या सेवेबद्दल सांगितले. आ-पला सत्कार केल्याबद्दल शाळेतील शिक्षकांना धन्यवाद दिले. व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

तिसे शाळेतील उपक्रमशिल आदर्श शिक्षिका श्रीम.श्रद्धा बिरगावले यांनी आपल्या खास शैलीत सूत्रसंचालन करून आपले मनोगत व्यक्त केले. शेवटी तिसे शाळेतील उपक्रमशिल शिक्षिका सौ.अनिता ढाकणे मँडम यांनी सर्वाचे आभार मानून या लसिकरण मोहिमेची सांगता करण्यात आली.